महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्रमांक :- इएनव्ही -२०१९/प्र.क्र.५९/तां.क.३
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक - १८ सप्टेंबर, २०१९

वाचा -

१) या विभागाचा शासन निर्णय क्रमांक योजना २००७/प्र.क्र.३४/तां.क.३, दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७
२) या विभागाचा शासन निर्णय क्रमांक इएनव्ही २०१६/प्र.क्र.७१/तां.क.३, दिनांक ८ नोव्हेंबर, २०१६.

प्रस्तावना -

पर्यावरण संवर्धनार्थ राज्याच्या स्थानीक गरजा लक्षात घेऊन लोकसहभागातून नाविन्यपूर्ण कार्यक्रम पर्यावरण विभागामार्फत सन २०१०-२०११ पासून राबविण्यात येत आहेत. या अनुषंगाने दिनांक ३० ऑगस्ट,२०१९ रोजी या कार्यक्रमासाठी गठीत सुकाणू समितीची बैठक पार पडली. या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार दिनांक ५ जून, २०१९ ते २१ ऑगस्ट, २०१९ या कालावधीत प्राप्त प्रस्तावांपैकी सुयोग्य प्रस्ताव निवडून त्यांना निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

लोकसहभागातून पर्यावरण संवर्धन नाविन्यपूर्ण कार्यक्रम राबविण्यासाठी मागविण्यात आलेल्या प्रस्तावांपैकी दिनांक ५ जून, २०१९ ते २१ ऑगस्ट, २०१९ या कालावधीत प्राप्त प्रस्तावांमधून मंजूर प्रस्ताव (फेरी तेरा अन्वये) व त्यांना वितरित करावयाचा निधी राज्य शासनाचा हिस्सा **(७५%)** खालीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	**व्यक्ती /संस्थेचे नांव**	**योजनेचे संक्षिप्त तपशील**	**मंजूर केलेला निधी (शासनाचा हिस्सा)**
१	श्रीकृष्ण शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद	हरित संकल्पना योजनेतंर्गत औरंगाबाद जिल्ह्यामध्ये Eco-friendly Sanitary Napkin या विषयाबाबत प्लॅस्टीकमुक्त रसायनविरहीत ऑरगॅनिक सॅनिटरी नॅपकीनच्या वापराबाबत प्रचार व प्रसार	रु. १०,००,०००/-
२	महिला आर्थिक विकास महामंडळ	आदिवासी भागातील महिलांना आरोग्य विषयक जाणीवा वृध्दीगंत करण्यसाठी पर्यावरणपूरक सॅनिटरी नॅपकिन या विषयाबाबत प्रबोधन करणेबाबत अ) जव्हार तालुका (पालघर) आ) मोखाडा तालुका (पालघर)	प्रत्येकी रु. ७,५०,०००/- असे एकूण रु. १५,००,०००/-

३	जय बजरंगबली व्यायाम मंडळ एकलारा, ता. मुखेड, जि. नांदेड	पळस, पिंपळ व वडाच्या पानांपासूव पत्रावळी व द्रोण निर्माण करण्याचे व्यवसाय प्रशिक्षणासाठी	रु. १०,००,०००/-
		एकूण	रु. ३५,००,०००/-

या शासन निर्णयान्वये रुपये ३५,००,०००/- (अक्षरी रुपये पस्तीस लक्ष फक्त) संबंधितांना मंजूर व मुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर निधी वितरणाबाबत अटी व शर्ती विस्तृतपणे सोबतच्या सहपत्रात नमूद करण्यात आलेल्या आहेत.

३. यासाठी कार्यासन अधिकारी, पर्यावरण विभाग (Section officer, Environment Department) यांचे नांवे ३५,००,०००/- (अक्षरी रुपये पस्तीस लक्ष फक्त) एवढया रकमेचा धनादेश काढण्यात यावा व त्यानुसार संबंधितांना त्यांच्या नावासमोर नमूद रक्कम स्वतंत्ररित्या धनादेशाव्दारे अदा करण्यात यावी.

४. उपरोक्त अदा करावयाचे रू. ३५,००,०००/- (अक्षरी रुपये पस्तीस लक्ष फक्त) अधिदान व लेखाधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून संबंधितांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्रीम. शिल्पा चं. शिर्के, कार्यासन अधिकारी, पर्यावरण विभाग व नियंत्रक अधिकारी म्हणून श्री. सु.कि. निकम, उप सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांना संबंधित व्यक्ती/ संस्था यांना वितरित करावयाचे एकूण रू. ३५,००,०००/- (अक्षरी रुपये पस्तीस लक्ष फक्त) अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून एकत्रित धनादेशाव्दारे वितरित करण्यासाठी प्राप्त करण्याची कार्यवाही करावी.

५. सदर होणारा खर्च मागणी क्र. यू-३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण, ०४, प्रदूषण व प्रतिबंध व नियंत्रण १०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना, (०२) पर्यावरण प्रतिबंध (०२) (१३) पर्यावरणविषयक जनजागृती शिक्षण व वातावरण बदल कृती योजना (३४३५१३०२), ३१ सहाय्यक अनुदान या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावी व तो सन २०१९-२० च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सन २०१९-२० या वर्षात सदर लेखाशिर्षाखाली रुपये ५,००,००,०००/- (अक्षरी रु. पाच कोटी फक्त) एवढी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ मधील परिच्छेद क्र.७ ते १८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. तसेच प्रमाणित करण्यात येते की दिनांक १८ एप्रिल,२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्टातील अनु.क्र.३ व ८ मधील अटींची पूर्तता होत आहे. तसेच सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३० जून, २०१७ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. या शिवाय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/ प्र.क्र.३१/ कोषा प्रशा ५ दिनांक १० मे, २०१६ अन्वये खालील बाबींची पूर्तता होत आहे.

१) विभागास प्रदान वित्तीय अधिकारानुसार सदर प्रस्तावास नियोजन विभागाची व वित्त विभागाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

२) सदर संस्थांना मागील ३ महिन्यात कोणताही निधी मुक्त करण्यात आलेला नाही.

३) मागणी क्र. यू-३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण, ०४, प्रदूषण व प्रतिबंध व नियंत्रण १०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना, (०२) पर्यावरण प्रतिबंध (०२) (१३) पर्यावरणविषयक जनजागृती शिक्षण व वातावरण बदल कृती योजना (३४३५१३०२), ३१ सहाय्यक अनुदान या मुख्यलेखाशिर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

८. उपरोक्त शासन निर्णयामध्ये वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं. २०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २ एप्रिल, २०१८ अन्वये ३१ सहाय्यक अनुदान या बाबी खालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील नमूद अटींची पूर्तता करण्यात आली आहे. मूळ शासन निर्णयातील मुद्या क्र.७ नंतर खालील अटींचा समावेश करण्यात आलेला आहे.

९. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं २०१८/प्र.क्र.६९/अर्थ -३, दिनांक २ एप्रिल २०१८ सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अनुक्रमांक १,२,३,५,६,७ या प्रकरणी लागू नाही तसेच सदर परिशिष्टातील अनुक्रमांक ४ बाबत नमूद करण्यात येते की, सदर योजना मान्यताप्राप्त असल्यामुळे व सदर खर्च ५ कोटीच्या आत असल्यामुळे नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

१०. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं.२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक २ एप्रिल, २०१८ च्या परिपत्रकासोबत दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजीच्या परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट अ.क्र.८ तपासणी सूचीमधील अनुक्रमांक १, २,४ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अटींची पूर्तता होत आहे. तसेच तपासणी सूचीमधील अनुक्रमांक ३ व अनुक्रमांक ५ ते १० या प्रकरणी लागू नाही.

११. सदर दोन्ही संस्थेकडून पर्यावरण विभागास कोणतेही येणे बाकी नाही.

१२. तसेच उपरोक्त शासन निर्णयाच्या “अ” मधील परिच्छेदातील ६,७,८, ९ या बाबी लागू नाहीत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकतेस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१८१५२९१४४००४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrakant Arun Vibhute

Digitally signed by Chandrakant Arun Vibhute
DN: CN = Chandrakant Arun Vibhute, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Environment Department
Date: 2019.09.21 15:11:47 +05'30'

(चंद्रकांत विभूते)
अवर सचिव, पर्यावरण विभाग

प्रत,

१) जिल्हाधिकारी, औरंगाबाद / पालघर / नांदेड

२) संबंधित व्यक्ती/संस्था

३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा, महाराष्ट्र १ / २, मुंबई /नागपूर)
४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
६) मा. मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा. राज्यमंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
९) वित्त विभाग कार्यासन क्र.व्यय १६, अर्थसंकल्प ७, मंत्रालय, मुंबई.३२
१०) नियोजन विभाग कार्यासन क्र.१४७२, मंत्रालय, मुंबई
११) संबंधित जिल्हा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
१२) रोखशाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) निवडनस्ती.

पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. :- इएनव्ही -२०१९/प्र.क्र.५९/तां.क.३, दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ चे सहपत्र.

पर्यावरण विभाग शासन निर्णय क्र. - इएनव्ही -२०१९/प्र.क्र.५९/तां.क.३, दिनांक १८/०९/२०१९ नुसार निवड प्राप्त "श्रीकृष्ण शिक्षण प्रसारक मंडळ", औरंगाबाद यांच्या ऑरगॅनिक सॅनिटरी नॅपकीन या संकल्पनेवरील प्रस्तावास सुकाणू समितीच्या निर्णयानूसार कार्यक्रम राबविण्याबाबतच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे -

१) प्रस्तावित संकल्पना औरंगाबाद जिल्ह्यामध्ये राबविण्यात यावी. सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी "श्रीकृष्ण शिक्षण प्रसारक मंडळ" यांच्या प्रस्तावामध्ये शासनाचा हिस्सा (७५%) म्हणून रु. १० लक्ष इतका निधी देण्याचा निर्णय समितीने घेतला आहे. उर्वरित २५% निधी (रु. ३.३३ लक्ष) इतका खर्च संस्थेने करावयाचा असल्याने एकूण रु. १३.३३ लक्ष इतक्या रकमेच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे. त्यासाठी संस्थेनी एकूण रु. १३.३३ लक्ष इतक्या खर्चाचा संपूर्ण तपशील बाब-निहाय तात्काळ सादर करण्यात यावा, त्यानंतरच काम हाती घेण्यात यावे.

२) प्रस्तावित प्रकल्पासाठी संस्थेने आपला २५% हिस्सा म्हणजे रुपये ३.३३ लक्ष एवढा हिस्सा संस्थेच्या नावे असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेत जमा केल्यानंतरच शासनाचा ७५% हिस्सा रु. १० लक्ष संस्थेस वितरीत केला जाईल.

३) प्रस्तावित प्रकल्पासाठी तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येणाऱ्या प्राथमिक बैठकांचे इतिवृत्त पर्यावरण विभागास सादर करण्यात यावे.

४) प्रकल्पातंर्गत वितरीत करण्यात येणारी सर्व माहिती, साहीत्य (पोस्टर्स, बॅनर्स इ.) मान्यतेसाठी प्रथम विभागास पाठविण्यात यावी. (सॉफ्ट व हार्ड कॉपी) विभागाच्या मान्यतेनंतर सदर साहीत्य वितरीत/ प्रदर्शित करता येईल.

५) संस्थेने दिलेल्या कार्यक्रमानूसार सदर निधीचा खर्च होत असल्याबाबतचे प्रमाणपत्र व प्रगती अहवाल दर महिन्याच्या १० तारखेपूर्वी पर्यावरण विभागास सादर करण्यात यावा. (सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी)

६) या कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रत्येक झालेल्या कार्यक्रमाचा (जसे की, बैठक, मेळावे इ.) फोटो व व्हिडीओ चित्रण काढणे बंधनकारक असून त्यावर दिनांक व वेळ प्रदर्शित होईल याची दक्षता घ्यावी व सदर फोटो व व्हिडीओ प्रगति अहवालासोबत सादर करावा.

७) संस्थेमार्फत देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणामध्ये ऑरगॅनिक सॅनिटरी नॅपकीनची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याबाबतही संबंधितांना प्रशिक्षण देण्यात यावे.

८) मान्य खर्चाच्या बाबींसाठी अन्य कोणत्याही स्त्रोतांमार्फत निधी प्राप्त होत असल्यास सदर बाब पर्यावरण विभागाच्या निदर्शनास आणून विभागाची पूर्व परवानगीने सदर खर्च करणे बंधनकारक आहे.

९) कार्यक्रम आयोजित करावयाचे बाब-निहाय तपशिल, खर्चाचा तपशिल पर्यावरण विभागाकडे सादर करावा.

१०) सदर योजनेच्या अंमलबजावणीत पर्यावरण विभागास काही त्रुटी आढळल्यास त्यानुरुप आवश्यक ती कारवाई, न्यायालयीन कारवाई करण्यास पर्यावरण विभाग मुक्त असेल. तसेच कोणत्याही पूर्व सूचना न देता संस्थेस मंजूर केलेली योजना रद्द करण्याचा अधिकार पर्यावरण विभागाकडे असेल.

११) उपरोक्त कार्यक्रमाबाबत स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी देणे बंधनकारक असून सदर बाबतची पेपर कटींग विभागाकडे सादर करण्यात यावीत.

१२) योजनांच्या अंमलबजावणीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र विहीत प्रारुपानूसार सादर करणे आवश्यक असून योजना पूर्ण झाल्यावर त्याच्या यशस्वीपणाबद्दल अहवाल तसेच Completion Report व ऑडीट अहवाल देणे संस्थेस बंधनकारक राहील.

१३) संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या अनुषंगाने भविष्यात काही न्यायालयीन वा अन्य बाबी उद्भवल्यास सदरबाबत संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील.

१४) संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या सदर योजनेकरिता शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानातून कोणतीही स्थावर मालमत्ता (उदा. जमिन, जागा, संगणक इ.) खरेदी केली जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

१५) वरील नमूद बाबींसंदर्भात रु. १००/- कोर्ट फी स्टॅम्प पेपरवर अटी व शर्ती मंजूर असलेले हमीपत्र सादर करणे बंधनकाराक आहे.

Chandrakant Arun Vibhute

Digitally signed by Chandrakant Arun Vibhute
DN: CN = Chandrakant Arun Vibhute, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Environment Department
Date: 2019.09.21 15:12:06 +05'30'

(चंद्रकांत विभूते)
अवर सचिव, पर्यावरण विभाग

पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. :- इएनव्ही -२०१९/प्र.क्र.५९/तां.क.३, दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ चे सहपत्र.

पर्यावरण विभाग शासन निर्णय क्र. - इएनव्ही -२०१९/प्र.क्र.५९/तां.क.३, दिनांक १८/०९/२०१९ नुसार निवड प्राप्त "महिला आर्थिक विकास महामंडळ" यांच्या ऑरगॅनिक सॅनिटरी नॅपकीन या संकल्पनेवरील प्रस्तावास सुकाणू समितीच्या निर्णयानूसार कार्यक्रम राबविण्याबाबतच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे -

१) सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी "महिला आर्थिक विकास महामंडळ" यांच्या आदिवासी भागातील महिलांना आरोग्य विषयक जाणीवा वृध्दीगंत करण्यसाठी पर्यावरणपूरक सॅनिटरी नॅपकिन या विषयाबाबत प्रबोधन करणेबाबत जव्हार तालुका (पालघर) - १० लक्ष व मोखाडा तालुका (पालघर) १० लक्ष हे दोन प्रस्ताव मंजूर करण्यात आले. सदर दोन्ही प्रस्तावांमध्ये शासनाचा ७५% हिस्सा म्हणून जव्हार तालुका (पालघर) करिता रु. ७.५ लक्ष व मोखाडा तालुका (पालघर) करिता रु. ७.५ लक्ष असे एकूण १५ लक्ष (रु. पंधरा लक्ष फक्त) इतका निधी मंजूर करण्यात येत आहे. सदर दोन्ही प्रस्तावांचे कार्यक्रम राबविण्यासाठी संस्थेने आपला २५ % हिस्सा म्हणजे जव्हार तालुका (पालघर) करिता रु. २.५ लक्ष व मोखाडा तालुका (पालघर) करिता रु. २.५ लक्ष रुपये असे एकूण रु. ५ लक्ष इतका किमान खर्च करावयाचा आहे. त्यासाठी संस्थेनी एकूण रु. २० लक्ष इतक्या खर्चाचा संपूर्ण तपशील बाब-निहाय तात्काळ सादर करण्यात यावा, त्यानंतरच काम हाती घेण्यात यावे.

२) प्रस्तावित दोन्ही प्रकल्पासाठी संस्थेने आपला २५% हिस्सा म्हणजे जव्हार तालुका (पालघर) करिता रु. २.५ लक्ष व मोखाडा तालुका (पालघर) करिता रु. २.५ लक्ष रुपये एवढा हिस्सा संस्थेच्या नावे असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेत जमा केल्यानंतरच शासनाचा ७५% हिस्सा जव्हार तालुका (पालघर) करिता रु. ७.५ लक्ष व मोखाडा तालुका (पालघर) करिता रु. ७.५ लक्ष संस्थेस वितरीत केला जाईल.

३) प्रस्तावित प्रकल्पासाठी तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येणाऱ्या प्राथमिक बैठकांचे इतिवृत्त पर्यावरण विभागास सादर करण्यात यावे.

४) प्रकल्पातंर्गत वितरीत करण्यात येणारी सर्व माहिती, साहीत्य (पोस्टर्स, बॅनर्स इ.) मान्यतेसाठी प्रथम विभागास पाठविण्यात यावी. (सॉफ्ट व हार्ड कॉपी) विभागाच्या मान्यतेनंतर सदर साहीत्य वितरीत/ प्रदर्शित करता येईल.

५) संस्थेने दिलेल्या कार्यक्रमानूसार सदर निधीचा खर्च होत असल्याबाबतचे प्रमाणपत्र व प्रगती अहवाल दर महिन्याच्या १० तारखेपूर्वी पर्यावरण विभागास सादर करण्यात यावा. (सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी)

६) या कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रत्येक झालेल्या कार्यक्रमाचा (जसे की, बैठक, मेळावे इ.) फोटो व व्हिडीओ चित्रण काढणे बंधनकारक असून त्यावर दिनांक व वेळ प्रदर्शित होईल याची दक्षता घ्यावी व सदर फोटो व व्हिडीओ प्रगति अहवालासोबत सादर करावा.

७) संस्थेमार्फत देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणामध्ये ऑरगॅनिक सॅनिटरी नॅपकीनची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याबाबतही संबंधितांना प्रशिक्षण देण्यात यावे.

८) मान्य खर्चाच्या बाबींसाठी अन्य कोणत्याही स्त्रोतांमार्फत निधी प्राप्त होत असल्यास सदर बाब पर्यावरण विभागाच्या निदर्शनास आणून विभागाची पूर्व परवानगीने सदर खर्च करणे बंधनकारक आहे.

९) कार्यक्रम आयोजित करावयाचे बाब-निहाय तपशिल, खर्चाचा तपशिल पर्यावरण विभागाकडे सादर करावा.

१०) सदर योजनेच्या अंमलबजावणीत पर्यावरण विभागास काही त्रुटी आढळल्यास त्यानुरुप आवश्यक ती कारवाई, न्यायालयीन कारवाई करण्यास पर्यावरण विभाग मुक्त असेल. तसेच कोणत्याही पूर्व सूचना न देता संस्थेस मंजूर केलेली योजना रद्द करण्याचा अधिकार पर्यावरण विभागाकडे असेल.

११) उपरोक्त कार्यक्रमाबाबत स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी देणे बंधनकारक असून सदर बाबतची पेपर कटींग विभागाकडे सादर करण्यात यावीत.

१२) योजनांच्या अंमलबजावणीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र विहीत प्रारुपानूसार सादर करणे आवश्यक असून योजना पूर्ण झाल्यावर त्याच्या यशस्वीपणाबद्दल अहवाल तसेच Completion Report व ऑडीट अहवाल देणे संस्थेस बंधनकारक राहील.

१३) संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या अनुषंगाने भविष्यात काही न्यायालयीन वा अन्य बाबी उद्भवल्यास सदरबाबत संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील.

१४) संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या सदर योजनेकरिता शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानातून कोणतीही स्थावर मालमत्ता (उदा. जमिन, जागा, संगणक इ.) खरेदी केली जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

१५) वरील नमूद बाबींसंदर्भात रु. १००/- कोर्ट फी स्टॅम्प पेपरवर अटी व शर्ती मंजूर असलेले हमीपत्र सादर करणे बंधनकाराक आहे.

Chandrakant Arun Vibhute

Digitally signed by Chandrakant Arun Vibhute
DN: CN = Chandrakant Arun Vibhute, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Environment Department
Date: 2019.09.21 15:12:22 +05'30'

(चंद्रकांत विभूते)
अवर सचिव, पर्यावरण विभाग

पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. :- इएनव्ही -२०१९/प्र.क्र.५९/तां.क.३, दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ चे सहपत्र.

पर्यावरण विभाग शासन निर्णय क्र. - इएनव्ही -२०१९/प्र.क्र.५९/तां.क.३, दिनांक १८/०९/२०१९ नुसार निवड प्राप्त “जय बजरंगबली व्यायाम मंडळ”, एकलारा, ता. मुखेड, जि. नांदेड यांच्या “पिंपळ, वड, पळसाच्या पानांपासून पत्रावळी व द्रोण बनविणे” या संकल्पनेवरील प्रस्तावास सुकाणू समितीच्या निर्णयानूसार कार्यक्रम राबविण्याबाबतच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे -

१) सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी “जय बजरंगबली व्यायाम मंडळ”, एकलारा, ता. मुखेड, जि. नांदेड यांच्या प्रस्तावामध्ये शासनाचा हिस्सा (७५%) म्हणून रु. १० लक्ष इतका निधी देण्याचा निर्णय समितीने घेतला आहे. उर्वरित २५% निधी (रु. ३.३३ लक्ष) इतका खर्च संस्थेने करावयाचा असल्याने एकूण रु. १३.३३ लक्ष इतक्या रकमेच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे. त्यासाठी संस्थेनी एकूण रु. १३.३३ लक्ष इतक्या खर्चाचा संपूर्ण तपशील बाब-निहाय तात्काळ सादर करण्यात यावा, त्यानंतरच काम हाती घेण्यात यावे.

२) प्रस्तावित प्रकल्पासाठी संस्थेने आपला २५% हिस्सा म्हणजे रुपये ३.३३ लक्ष एवढा हिस्सा संस्थेच्या नावे असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेत जमा केल्यानंतरच शासनाचा ७५% हिस्सा रु. १० लक्ष संस्थेस वितरीत केला जाईल.

३) प्रस्तावित प्रकल्पासाठी तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली झाडांच्या पानांपासून हाताने द्रोण पत्रावळ निर्मितीबाबत बचत गटांना प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील. याकरिता यंत्राचा/मशीनचा वापर होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

४) प्रकल्पातंर्गत वितरीत करण्यात येणारी सर्व माहिती, साहीत्य (पोस्टर्स, बॅनर्स इ.) मान्यतेसाठी प्रथम विभागास पाठविण्यात यावी. (सॉफ्ट व हार्ड कॉपी) विभागाच्या मान्यतेनंतर सदर साहीत्य वितरीत/प्रदर्शित करता येईल.

५) प्रस्तावित प्रकल्पासाठी पिंपळ, वड व पळसाच्या पानांचा वापर होणार असल्याने वनसंपदेवर परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन त्याप्रमाणात पिंपळ, वड व पळसाच्या वृक्षांची नव्याने लागवड करण्यात यावी.

६) संस्थेने दिलेल्या कार्यक्रमानूसार सदर निधीचा खर्च होत असल्याबाबतचे प्रमाणपत्र व प्रगती अहवाल दर महिन्याच्या १० तारखेपूर्वी पर्यावरण विभागास सादर करण्यात यावा. (सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी)

७) या कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रत्येक झालेल्या कार्यक्रमाचा (जसे की, बैठक, मेळावे इ.) फोटो व व्हिडीयो चित्रण काढणे बंधनकारक असून त्यावर दिनांक व वेळ प्रदर्शित होईल याची दक्षता घ्यावी व सदर फोटो व व्हिडीयो प्रगति अहवालासोबत सादर करावा.

८) मान्य खर्चाच्या बाबींसाठी अन्य कोणत्याही स्त्रोतांमार्फत निधी प्राप्त होत असल्यास सदर बाब पर्यावरण विभागाच्या निदर्शनास आणून विभागाची पूर्व परवानगीने सदर खर्च करणे बंधनकारक आहे.

९) कार्यक्रम आयोजित करावयाचे बाब-निहाय तपशिल, खर्चाचा तपशिल पर्यावरण विभागाकडे सादर करावा.

१०) सदर योजनेच्या अंमलबजावणीत पर्यावरण विभागास काही त्रुटी आढळल्यास त्यानुरुप आवश्यक ती कारवाई, न्यायालयीन कारवाई करण्यास पर्यावरण विभाग मुक्त असेल. तसेच कोणत्याही पूर्व सूचना न देता संस्थेस मंजूर केलेली योजना रद्द करण्याचा अधिकार पर्यावरण विभागाकडे असेल.

११) उपरोक्त कार्यक्रमाबाबत स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी देणे बंधनकारक असून सदर बाबतची पेपर कटींग विभागाकडे सादर करणे.

१२) योजनांच्या अंमलबजावणीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र विहीत प्रारुपानूसार सादर करणे आवश्यक असेल तसेच योजना पूर्ण झाल्यावर त्याच्या यशस्वीपणाबद्दल अहवाल तसेच Completion Report व ऑडीट अहवाल देणे आवश्यक राहील.

१३) संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या सदर योजनेकरिता शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानातून कोणतीही स्थावर मालमत्ता (उदा. जमिन, जागा, संगणक इ.) खरेदी केली जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

१४) वरील नमूद बाबींसंदर्भात रु. १००/- कोर्ट फी स्टॅम्प पेपरवर अटी व शर्ती मंजूर असलेले हमीपत्र सादर करणे बंधनकाराक आहे.

Chandrakant Arun Vibhute

Digitally signed by Chandrakant Arun Vibhute
DN: CN = Chandrakant Arun Vibhute, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Environment Department
Date: 2019.09.21 15:12:40 +05'30'

(चंद्रकांत विभूते)
अवर सचिव, पर्यावरण विभाग